## प्रकरण दुसरे

" अभोगी " या कादंबरीचा सामाजिक आणि
वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास

मराठी कादंबरी वाङ्मयात प्रामुख्याने आढळणाऱ्या रंजनवादी आणि सामाजिक प्रवृत्तीच्या कादंबऱ्यांचा आढावा घेतला, त्यांची स्वरूप आणि वैशिष्टये ही आपण पाहिली. या दोन प्रवृत्तीच्या रणजित देसाई यांच्या " अभोगी " व शुभांगी भडे यांच्या " जोगीण " या कादंबरीचा वाङ्मयीन आणि सामाजिक दृष्टीने अभ्यास करण्याचे या प्रबंधिकेत योजले आहे.

रणजित देसाई यांनी " अभोगी " ही कादंबरी १९८७ साली लिहली, त्यापूर्वी वीस वर्षे अगोदर कै. राजाभाऊ ठाकूर यांच्या मागणीनुसार या विषयावर पटकथा लिहिली होती. पण दुर्दैवाने या पटकथेवर चित्रपट निघू शकला नाही. त्यामुळे माधवी देसाई आणि काही मित्रांच्या आग्रहावरून त्याच पटकथेच्या आधारे रणजित देसाई यांनी भाविणीच्या जीवनानुरोधाने " अभोगी " ही कादंबरी लिहिली.

## रणजित देसाई व्यक्ती आणि वाङ्मय

रणजित देसाई मराठीतील एक मान्यवर लेखक आहेत. त्यांनी मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात विविध प्रकारचे लेखन केले आहे. कोल्हापूर जिल्हयातील कोवाड या लहानश्या गावी त्यांचे वास्तव्य होते. सरंजामी वातावरणात त्यांच्या व्यक्तीमत्वाची जडण-घडण झाल्यामुळे त्यांना संगीत, कला आणि साहित्य यांची आवड होती. इतिहासाच्या वारसा सांगणाऱ्या घराण्यातून ते आल्यामुळे त्यांचा मनोपिंड ही इतिहास आणि पुराणात रमणारा होता. या आवडीतून त्यांच्या गाजलेल्या " श्रीमानयोगी "," रवि वर्मा", " स्वामी ", " राधेय " या सारख्या कलाकृती निर्माण झाल्या आहेत. ग्रामीण परिसरात दीर्घकाळ त्यांनी वास्तव्य केले असल्यामुळे ग्रामीण जीवनानुभवाच्या अंगाने " माझा गाव " व " समिधा "

या सारख्या कादंब-या व काही कथा संग्रहातून ग्रामीण जीवनाचे त्यांनी चित्रण केले आहे. संगीत, चित्र, नाट्य आणि साहित्य या अभिजात कलांच्या आवडीमुळेही त्यांच्या " रविवर्मा "," अभोगी " या सारख्या कलाकृतीतून त्याचे चित्रण आलेले आढळते. स्वातंत्र्योत्तर काळातील ते एक महत्वाचे लोकप्रिय लेखक होते. विविध कारणांनी केलेल्या प्रवासातूनही आलेल्या जीवनानुभवावर त्यांनी ललित साहित्याची निर्मिती केली आहे.

रणजित देसाई यांनी कादंबरी, कथा, नाटक आणि ललितलेख, पटकथा, यासारख्या विविध वाङ्‌मय प्रकारातून विपुल साहित्य निर्मिती केली आहे. त्यांच्या एकूण दहा कादंब-या प्रसिध्द झाल्या आहेत. " बारी ", " पावनखिंड"," राधेय, " श्रीमानयोगी"," समिधा," "स्वामी" "माझा गाव," " राजा रविवर्मा " "लक्ष्यवेध," आणि " अभोगी " इ. कादंब-या आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी विपुल प्रमाणात कथा लेखनही केले आहे. आलेख, अभोगी, कमोदिनी, कातळ, गंधाली, जाण, मधुमती, मोरपंखी, सावल्या, रूपमहाल, मेघमंजरी, इ. सतरा कथासंग्रह लिहिले आहेत. ग्रामीण, नागर, पौराणिक, ऐतिहासिक अशा विविध प्रकारच्या विषयावर त्यांनी तितक्याच समरसतेने कथालेखन केलेले आढळते. कथा कादंबरी प्रमाणेच त्यांनी विपुल नाटयलेखन ही केले आहे. उन्हाची सावली, कांचनमृग, गरूडझेप, तुझी वाट वेगळी, पंख झाले वैरी, पांगुळगाडा, रामशास्त्री, धन अधूरे, लोकनायक, वारसा, स्वरसम्राट, तानसेन, स्वामी, हे बंध रेशमाचे, या सारखी तेरा नाटके त्यांनी लिहिली आहेत. वाङ्‌मयीन आणि प्रायोगिक दृष्टयाही त्यांची काही नाटके वैशिष्टय पूर्ण आहेत. चित्रपटांच्या कथाही त्यांनी लिहिल्या, नागीन, रंगल्या रात्री अशा, सवाल माझा ऐका, व रांगोळी रायण्णा ( कानडी ), इ. चित्रपटांच्या कथा त्यांच्या आहेत. तसेच त्यांनी " मी एक प्रेक्षक", या नावाचा लेखसंग्रहही लिहिला आहे. त्यातून त्यांची अभिजात रसिकता प्रकट झाली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील रणजित देसाई हे एक लोकप्रिय लेखक असल्यामुळे अनेक ठिकाणच्या साहित्य संमेलनातून त्यांनी अध्यक्ष पदे भूषविले आहे. बडोदे येथील मराठी वाङ्‌मय परिषद ( १९६५ ) औदुंबर मराठी साहित्य संमेलन ( १९६९) साहित्य संमेलन ( कल्याण) (१९७२) मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन गोरेगाव ( १९७०) मराठी ग्रंथालय परिषद वाई, ( १९८१) अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कोल्हापूर ( १९८३) द. महाराष्ट्र ग्रामीण साहित्य संमेलन इस्लामपूर ( १९८४), इ. संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तसेच १९७४ साली इचलकरंजी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य सोशल वेलफेअर बोर्डाचे सदस्य, साहित्य अकादमीचे सदस्य, शिवाजी विद्यापीठाच्या विधीसभेचे सदस्य, आणि विशेष दंडाधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

अशा प्रकारे वाङ्‌मयाच्या क्षेत्रात विविध स्वरूपाचे लेखन करणाऱ्या रणजित देसाई यांनी गोव्यातील मंगेशीच्या भाविणीच्या जीवनानुरोधाने " अभोगी " ही कादंबरी लिहली आहे. या कादंबरीचा वाङ्‌मयीन आणि सामाजिक दृष्टया अभ्यास अभिप्रेत आहे.

" अभोगी " कादंबरीचा विषय :
---------------------------

रणजित देसाई यांना जशी प्रवासाची आवड होती तशी संगीताची आवड होती. गोव्यातील मंगेशीच्या मंदिरात दरवर्षी संगीत महोत्सव होत असतो. या महोत्सवाला काही वेळा रणजित देसाई उपस्थित राहत. मंगेशीतील भाविणी, त्याचे जीवन त्यांनी पाहिले होते. भाविणीची सेवाभावीवृत्ती, संगीत व नृत्यांची आवड आणि विलोभणीय सौंदर्य यामुळे या विषयावर लेखन करावे असे त्यांना वाटले असावे. यातूनच त्यांना चित्रपट कथा सुचली. या विषयावरच त्यांनी " अभोगी " ही कादंबरी लिहिली आहे. " अभोगी " या कादंबरीत एक भाविणीच्या मुलीची असफल प्रेम कहाणी चित्रीत केली आहे. या अनुषंगाने भाविणींच्या जीवनावर व उदात्त प्रेमानुभवाचेही चित्रण या कादंबरीत आले आहे.

" अभोगी " या कादंबरीचे आशयसौंदर्य

" अभोगी " ही रणजित देसाई यांची भाविणीच्या मुलीचे चित्रण करणारी कादंबरी आहे. केशर ही या कादंबरीची नायिका असून ती चंपा भाविणीची मुलगी आहे व ती "अभोगीच" राहते असे या कादंबरीत दाखवले आहे. महेश या गायकावर तिचे प्रेम असते तरी तिचे हे प्रेम सफल होऊ शकत नाही. तिला संसारी जीवन जगता येत नाही, त्यामुळे भावनिक आणि शारीरिक दृष्ट्या ती अतृप्त राहते म्हणून या कादंबरीला अभोगी हे नाव दिले आहे.

कैलास हा मुंबईतील कमलाकर नावाच्या जवाहीऱ्यांचा मुलगा लहानपणीच त्यांची आई वारली आहे. मुंबईला त्याने एम. बी. बी. एस. चे शिक्षण घेतले आहे. उच्च शिक्षण तो इंग्लंडमध्ये पूर्ण करून भारतात येतो. याच वेळी उल्का नावाची त्यांनी पत्नी क्षयाने वारते. वडिलही अल्पावधीतच हृदयविकाराने वारतात, त्यामुळे उदास होऊन तो एकाकीपणे आपले संपूर्ण जीवन गोरगरीबांच्या रूग्णांच्या सेवेसाठी व त्यांना आपुलकी, प्रेम, कौटुंबिक जिव्हाळा देणारे रूग्णालय चालवतो. कैलासला संगीताची आवड आहे. त्याला कोणतेही वादय वाजवता येत नसले तरी त्याने एक रसिक म्हणून आपली संगीताची आवड जोपासली आहे. उल्काही चांगली सतारवादक होती. ती वाजवत असलेली सतार तो तिची आठवण म्हणून जपून ठेवतो. गोव्यातील मंगेशी या दैवता विषयी त्यांच्या मनात श्रध्दा हा आहे तो वारंवार दर्शनासाठी मंगेशीला जातो. तिथे त्यांचा एक वडिलार्जित बंगला आहे. या बंगल्याची व्यवस्था चंपा नावाची भाविण पाहत असते. एकदा मंगेशीला गेली असताना महेश या गायकाचे गाणे असते आणि त्यासाठी प्रचंड गर्दी जमलेली होती. कैलास रसिक असल्याने हे गाणे ऐकण्यास जातो.

महेश हा प्रसिध्द गायक आहे. तो मुळचा गोव्यातील मंगेशीचा मंगेशीच्या संगीतमय वातावरणात त्याचे बालपण गेले आहे. संगीताचा वारसा त्याला भजन, कीर्तन करणाऱ्या वडिलांनकडून मिळाला. त्याचा

आवाज अत्यंत चांगला होता. लहानपणीच आई वडील वारल्याने त्यांचा संभाळ गोपूकाकांनी केला. गोपू काका हे स्वार्थी आणि कंजूष असल्यामुळे महेशला ते वडीलाचे प्रेम देऊ शकले नाहीत. रंगामास्तर या वडीलांच्या मित्राने पितृप्रेम आणि चंपा भागिनीनीं आईचे प्रेम दिले आहे. चंपा भाविणीची मुलगी केशर आणि महेश हे लहानपणापासून एकत्र वाढलेले आहेत, व खेळलेले आहेत. त्यांनी रंगामास्तरांच्या संगतीत संगीताचे पहिले धडे घेतले आहेत. पुढे नारायण बुवा यांच्या कडून महेशने संगीताचे शास्त्रशुध्द शिक्षण घेतल्यामुळे तो प्रसिध्द गायक होतो. देशातील अनेक शहरात त्याचे गायनाचे कार्यक्रम झाले आहेत. यातून मिळालेला बराचसा पैसा आपल्या काकाला दिला. महेश आजारी पडल्यामुळे तो विश्रांतीसाठी मूळ गावी मंगेशीला येतो. मंगेशीच्या संगीत महोत्सवात त्याचे गाणे ठेवले आहे. शास्त्रोक्त संगीत गाताना त्याची दमछाक होते व खोकला येतो. कैलास हा डॉक्टर महेशाची तपासणी करून त्याला क्षय झाल्याचे सांगतात व औषधे लिहून देतात. पुढे महेशाचा क्षयाचा आजार बळावतो. गोपूकाका औषध उपचार करीत नाहीत त्या काळात क्षय हा भयानक आजार असल्यामुळे त्याला जास्त झाल्यावर रंगामास्तर घाबरून लोणावळयाहून डॉक्टर कैलासला बोलवून घेतात. कैलास औषधी उपचारासाठी त्याला लोणावळयाला घेऊन जातो. जाता केशरचे महेशावर प्रेम असल्यामुळे आजारपणात सेवा शुश्रुषा करण्यासाठी महेश बरोबर केशर लोणावळयाला जाते. लोणावळयाला डॉक्टर कैलासच्या औषधोउपचारामुळे महेशाची प्रकृती सुधारते. संगीताची आवड असल्यामुळे आणि उल्काही आपली पत्नी क्षयाने वारल्यामुळे दुर्दैवाने महेशाची तिच गत होऊ नये म्हणून आपले वैद्यकीय ज्ञानपणाला लावून तो औषधोपचार करतो व आपल्या घरातच त्यांची व केशरची व्यवस्था करतो. या औषधोउपचारामुळे महेश बरा होतो. एकदा महेश आणि केशर फिरायला गेले असताना पावसात भिजल्यामुळे त्याला ताप योतो व तापात त्यांचा आवाज जातो. आवाजच महेशाच्या जीवनाचे सर्वस्व होते. त्यामुळेच त्याला नावलौकिक मिळाला होता.

हा आवाजच गेल्यामुळे गायक म्हणून आपण संपलो कैलासने केवळ आपण गायक असल्यामुळेच आपणावर औषधोपचार केला आहे आता आपल्याला येथे राहण्याचा अधिकार नाही म्हणून तो कैलासचे घर सोडून निघून जातो. मात्र जाताना केशरने केलेल्या त्यागाची सेवा, सुश्रूषाची कोणतीही कृतज्ञता तो बाळगत नाही. त्यामुळे केशरला अत्यंत वाईट वाटते. महेश निघून गेल्यावर येथे राहण्यात अर्थ नाही म्हणून ती मंगेशीला परत जाते. सर्व हकीकत ती रंगामास्तर व आईला सांगते. चंपाने केशरचे महेशावर प्रेम आहे हे ओळखून व तिला भविष्यात सुखी संसारी जीवन लाभावे म्हणून महेश बरोबर लोणावळ्याला पाठवीलेले असते. पण महेश निघून गेल्यानंतर ही अपेक्षा कमी होते. मुंबईचा एक श्रीमंत विधुर लक्ष्मीकांत केशरला मागणी घालतो, चंपा मुलीच्या भवितव्याचा विचार करून त्यास संमती देते. ही गोष्ट केशरकडून रंगामास्तराना समजल्यावर ते केशरसाठी डॉ. कैलासने मागणी घालावी म्हणून प्रयत्न करतात. केशर ही लक्ष्मीकांत या व्यापाऱ्याची रखेली होऊन राहण्यापेक्षा ती डॉ. कैलासची पत्नी म्हणून राहिल्यास अधिक सुखी होईल म्हणून ते लोणावळ्याला जाऊन कैलासचे पाय धरून मागणी घालण्याची विनंती करतात. त्या विनंतीला मान देऊन कैलास केशरला मागणी घालतो. लोणावळ्याला आणून ठेवतो व बहीण म्हणून वागणूक देतो. पुढे दोन वर्षांनी एका गायनाच्या प्रसंगी महेशाचा आवाज परत येतो तो मंगेशीला परत येतो. चंपा व रंगामास्तरांना भेटतो. कैलासने केशरला मागणी घातल्याचे समजते नंतर तो लोणावळ्याला जातो, " अभोगी " राग गातो. कैलास बद्दल त्यांचे मत कलुषित झालेले असते. म्हणून तो कैलास व केशरला वाटेल ते बोलतो. केशर कैलासची बाजू घेते. म्हणून तो अधिक चिडतो तेव्हा कैलास सर्व गोष्टीचा उलगडा करतो. त्यानंतर केशरला तो बरोबर घेऊन जाऊ पाहतो पण मागील सर्व घटनातून महेश निर्गुणपणे प्रेमहीन वागलेला असल्यामुळे केशर त्यांची जीवनसाथी म्हणून निवड करीत नाही. अशा प्रकारे केशर

केशर, महेश, कैलास हे सर्व अभोगी आणि अतृप्त राहतात. एका प्रेमकहाणीचा शोकांत होतो.

" अभोगी " या कादंबरीतील आशय हे एक उदात्त प्रेमकहाणीचा वाटतो. केशर ही भाविणीची मुलगी म्हणजे रूढ अर्थाने समाजाची भोगदासीच. ती महेशावर प्रेम करतो. मागणी घालून कैलासची पत्नी पण कोणत्याही अर्थाने तिचे जीवन सुखी संसारी होत नाही. या कादंबरीतील सर्वच पात्रे म्हणजे केशर, महेश आणि कैलास अभोगी राहिली आहेत. या कादंबरीच्या कथानकात संगीताला अनन्यसाधारण महत्व आहे. महेश व केशर गायक आहेत. कैलास रसिक आहे शेवटी महेश कैलासच्या घरी अभोगी हा करुण राग गाऊन जणू सर्व पात्रांच्या जीवनातील कारुण्य आणि दु:खच प्रकट करतो.

या कादंबरीत चंपा या भाविणीची केशर ही मुलगी आहे. पण लेखकाने भाविणीचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, तिचा कोंडमारा किंवा एक देवाच्या नावावर असलेली भोगदासी म्हणून भोगाव्या लागणाऱ्या यातना याचे फारशा गांभीर्याने आणि वास्तवपणे चित्रण केलेले नाही. चंपा ही भाविण असली तरी तिची ही जीवनगाथा विस्ताराने लेखकाने चित्रित केलेली नाही. फक्त केशर ही भाविणीची मुलगी आहे इतकाच या प्रश्नाचा आशयासाठी आधार लेखकांनी घेतला आहे. कोणत्याही सामान्य मुलीच्या वाटेला येईल असे दु:ख केशरच्या वाटयाला आले आहे. भाविणीची मुलगी असल्यामुळे जी दाहकता, जे वास्तव तिला भोगायला लागायला पाहिजे ते इथे चित्रित झाले नाही मुळात कादंबरी एक चित्रपटाची कथा लिहल्यामुळे प्रेक्षकांच्या आवडी निवडीचा विचार करून ती रंजनवादी करण्याकडेच लेखकाचा कल दिसतो. श्रीमंत ध्येयनिष्ठ, सेवाभावी, उदात्त, असे कैलासचे वर्णन येते. तर केशर ही भाविणीची मुलगी, सुंदर सेवाभावी, उदात्तपणे प्रेम करणारी प्रेयसीच वाटते. महेश हा अलौकिक स्वरूपाचा गायक दाखवला आहे. त्याच्या जीवनात जी संकटे व दु:खे येतात ती केवळ दैवाने वा योगायोगाने निर्माण होतात. त्याचा आवाज जातो व दोन

वर्षांनी परत येतो. याची घटणारी मीमांसा कादंबरी चित्रीत करीत नाही, त्यामुळे हे केवळ रंजनवादी कादंबरीत व चित्रपटात शोभेल अशी इतिही केवळ लेखकांनी दाखवली आहेत. या आशयाचा स्त्री जीवनाचा अंगाने विचार केला तरी होती समाधानकारक वाटत नाही. रणजित देसाई यांना भाविणीचे जीवन दुःख आणि समस्या वास्तवाने व गांभीर्याने मांडायचे नव्हते असे दिसते. केवळ भाविणीची मुलगी म्हणून तिचे चित्रण येते. पण ती भाविणीचे दुःख, व्यथा, वेदना अनुभवत नाही. त्यामुळे ही कादंबरी रंजनवादी ठरते. तिच्या आशयाला सामाजिक कादंबरीची वैशिष्ट्ये पूर्णतः लाभत नाहीत.

अभोगी कादंबरीतील व्यक्तिचित्रणे :

कादंबरीतील जीवनाशय व्यक्तिचित्रणाच्या अनुषंगाने साकार झालेला असतो. त्यामुळे कोणत्याही कादंबरीत व्यक्तिचित्रणाला अनन्यसाधारण महत्व असते. व्यक्तिचित्रणांच्या कौशल्यावर कादंबरीचे महत्व अवलंबून असते. श्रेष्ठ कलाकृतीतील व्यक्तिचित्रणे तितकीच श्रेष्ठ व जीवंत असतात. ती रसिकाच्या मनात घर करून राहतात. त्यांचा रसिकांवर दीर्घकाळ परिणाम होत असतो. " अभोगी " या कादंबरीतील केशर, महेश, कैलास ही महत्वाची पात्रे आहेत त्यांच्या जीवनाचे चित्रण कादंबरीत पुढीलप्रमाणे येते.

केशर :

केशर ही " अभोगी " या कादंबरीची नायिका आहे. कोकण आणि गोव्यात मंदिराच्या सेवेसाठी ज्या भाविणी आढळतात त्या भाविणीची ही मुलगी, तिची आई चंपा ही गोव्यातील मंगेशी या प्रसिध्द मंदिरातील भाविण आहे. केशर ही भाविणीची मुलगी असल्यामुळे परंपरेने समाजात भाविणीचे जे स्थान असते त्याच दृष्टीने तिच्याकडे पाहिले जाते. प्रत्यक्ष ती जरी कादंबरीत भाविण म्हणून चित्रित केली नसली तरी तिच्या वाट्याला भाविणीचे थोडे फार दुःख येतेच.

केशर ही दिसायला सुंदर, गोरीपान, सडसडीत, बांध्याची आहे. स्वभावाने सहजनशील, सेवाभावी, समजंस, निसर्गावर प्रेम करणारी आणि संगीताची आवड असणारी आहे. लहानपणापासून ती मंदिराच्या परिसरात भाविणीच्या परंपरेत वाढल्यामुळे काही गोष्टी तिच्या व्यक्तिमत्वात आल्या आहेत. भाविणीने मंदिरात गायन आणि नृत्याची सेवा रूजू करण्याची परंपरा आहे. लहान असताना ती महेश बरोबर रंगामास्तरांकडे भजन, किर्तन शिकते. त्यातून ती स्वत: महेश इतकी प्रसिध्द गायिका नसली तरी गायनाचे तिला अंग आहे. संगीताची तिला आवड आहे, एका प्रसंगी मंगेशीला महेशाचा गायनाचा कार्यक्रम असतो. तो वेळेवर उपस्थित रहात नाही. म्हणून रंगामास्तरांच्या आज्ञेवरून ती गौळण म्हणते, या गौळणीबद्दल महेशाची प्रतिक्रिया मोठी बोलकी आहे. भाविणी हौशी लोकांचे मन रिझवण्यासाठी गायन आणि नृत्याचा उपयोग करतात. त्याच पध्दतीची "अदा करून म्हणायला ठीक आहे" १ असा अभिप्राय महेश व्यक्त करतो. यावरून भाविणीच्या गाण्याकडे समाजाची पाहण्याची कोणती दृष्टी असते हे स्पष्ट दिसते. म्हणजे भाविणीचे गायन, नृत्य, किंवा संगीत हे तिच्या व्यक्तिमत्वाचे विकासाचे लक्षण नसून सामाजिक दृष्ट्या ते अधःपतनाचे निदर्शक असते. म्हणजे तमाशातील लावणी गायिकेला गायक म्हणून जो सन्मान आणि दर्जा समाजात मिळाला पाहिजे तो तिला मिळत नाही. तसेच भाविणीचे असते. केवळ तिने लोकांची मने वळवण्यासाठीच या कलेचा वापर करावा इतकीच मर्यादीत अपेक्षा असते. म्हणून एक गोष्ट स्पष्ट होते. महेश जसा पुढे गायक म्हणून नावलौकिकाला आला तशी केशर गायिका होऊ शकत नाही. तिची ही कलेची साधना मर्यादीतच राहते. समाजाच्या अपेक्षेप्रमाणे भाविणीचे गायन हे केवळ अदा करून दाखवण्यापुरतेच असते. पुढील जीवनात ती गायिका म्हणून विकसीत होताना दिसत नाही.

केशर ही गोव्याच्या निसर्गरम्य परिसरात लहानाची मोठी झाल्यामुळे निसर्गाची खूप आवड आहे. महेश बरोबर ती लोणावळ्याला आल्यावर तिला मंगेशीच्या परिसरातील माडांची, बकुळीच्या फुलांची व तेथील निसर्गाची आठवण होते. लोणावळ्यात ती स्वत: बाग लावते, तिची व्यवस्था पाहते, फुले तोडण्यास मनाई करते. तिने लावलेल्या गुलाबाच्या झाडाला पहिले फुल आल्यावर तिला कमालीचा आनंद होतो, यावरुन केशर ही निसर्गावर प्रेम करणारी आणि निसर्गात रमणारी आहे.

भारतीयात आढळणारी सेवाभावी वृत्ती तिच्या ठिकाणी आहे. महेशावर तिचे प्रेम आहे या प्रेमापोटी ती मंगेशीला आणि लोणावळ्याला त्याची सेवा आणि सुश्रुषा मनापासून करते, त्यांच्या आजारपणात त्याला मानसिक आणि भावनिक आधार देते, खरे तर त्या काळात क्षयासारख्या विकाराच्या रोगाची कुटुंबातसुध्दा वेगळी व्यवस्था होती अशा परिस्थितीत ही ती स्वत:चा कोणताही विचार न करता महेशाची मनापासून सेवा करते पण महेश तिच्या या सेवाभावी वृत्तीची कोणतीही कदर करीत नाही. उलट एक स्त्री भाविणीची मुलगी व प्रेयसी म्हणून तिची सेवा गृहितच धरतो. महेशाच्या बाबतीतच नव्हे तर कैलासच्या कुटुंबात बहिण म्हणून रहात असतानाही तीची ही सेवा भावी वृत्ती दिसून येते.

जशी ती सहनशील वृत्तीची आहे. महेशावर प्रेम केल्यामुळे महेशाचे काका तिला व महेशाला बोलतात पण ती त्याला प्रतिउत्तर देत नाही उलट मुकपणे सहन करते. महेशाच्या बोलण्यातूनही अनेकदा भाविणीची मुलगी म्हणून तिची हेटाळणी होते. तरीही ती सहन करते यातून तिचा सहनशील स्वभावच दिसून येतो.

अशी ती सहनशील वृत्तीची आहे. महेशवर प्रेम केल्यामुळे महेशाचे काका तिला व महेशला बोलतात पण ती त्याला प्रतिउत्तर देत नाही उलट मुकपणे सहन करते. महेशाच्या बोलण्यातूनही अनेकदा भाविणी मुलगी म्हणून तिची हेटाळणी होते. तरीही ती सहन करते. यातून तिचा सहनशील स्वभावच दिसून येतो.

केशर ही एक प्रेयसी म्हणून ही तितकीच उदात्त आणि श्रेष्ठ वाटते. लहानपणापासून एकत्र खेळलेल्या, वाढलेल्या आणि गायलेल्या महेशावर तिचे जीवापाड प्रेम आहे. केवळ तो गायक आहे म्हणून नाही तर एक माणूस म्हणून ती त्याच्यावर प्रेम करते. क्षयाच्या आजारपणात त्याला आधार देऊन सेवा करते. कादंबरीभर ती एक प्रेयसी म्हणून चित्रित केली आहे तिच्या लहान सहान कृत्यातूनही तिचे महेश वरील प्रेम दिसून येते. प्रसंगी ती आपल्या सोन्याच्या बांगड्या विकून महेशला आजारपणात थंडी वाजू नये म्हणून कपडे घेते. पथ्य पाणी करते, पण महेश आपल्याशी लग्न करणार आहे हीच तीची भूमिका असते. महेश तिच्या उत्कट आणि निस्वार्थ प्रेमाची कदर करीत नाही. उलट तो " भाविणीच्या पोरीला लग्नाची गरज केव्हापासून वाटू लागली;[२] असं म्हणून तिच्या प्रेमाच्या अपेक्षेची अवहेलना करतो, त्याचा आवाज गेल्यानंतर महेश घर सोडून जाताना तो तिच्या अस्तित्वाची दखल सुध्दा घेत नाही. कैलासला लिहिलेल्या चिठ्ठीत तिचा उल्लेख करीत नाही. यामुळे तिला खूप दु:ख होते. महेशाच्या या प्रेमहीन वागण्यामुळे शेवटी ती त्याला नकार देते. या सर्व कादंबरी भर ती एक प्रेयसी म्हणून सतत वावरताना दिसते.

" अभोगी " ही कादंबरी भाविणीच्या जीवनावर लिहली आहे. केशर ही चंपा भाविणीची मुलगी आहे. परपंरेने येणारे भाविणीचे जीवन चंपाच्या वाट्याला येते. म्हणजे मंदिराची, सेवा करणे, पालखी-पुढे नाचणे, भिंतीला टेकून उभे राहणे व पुजा-याने दिलेला विडा

घेऊन मिळेल त्या हौशी धन्याला घरी घेऊन येणे, त्याची संगत करणे व आयुष्यभर हेच करीत राहणे, हे दु:ख चंपाच्या वाटेला आलेले आहे. यामुळे केशरचे वडील कोण आहेत हे सांगता येत नाही व कादंबरीत ते आलेले नाही त्यामुळे पितृप्रेम हिनतेचे दु:ख तिच्या वाटेला येते. परंपरेने येणारे भाविणीचे दु:खद कष्ट, जीवन आपल्या मुलीच्या वाटयाला येऊ नये म्हणून चंपा केशर आणि महेशाच्या प्रेमाला विरोध करीत नाही. केशरने महेशाशी लग्न करून सुखी संसार करावा अशीच तिची इच्छा असते. त्यामुळे महेश आजारी पडल्यानंतर जेव्हा केशर त्याची सेवा सुश्रुशा करण्यासाठी लोणावळयाला जाण्याचे ठरवीते तेव्हा ती त्यांना संमती देते. तर केशरचे महेशावर प्रेम आहे ती आजारपणात त्याची सेवा करते. पण महेश आवाज गेल्यावर निघून जातो आणि तिच्या जीवनात प्रश्न निर्माण होतो. भाविणीच्या मुलोला सभ्य आणि सुसंस्कृत समाजातील तरूण अविवाहीत पुरूष पत्नी म्हणून स्वीकारत नाही. मुंबईचा एक श्रीमंत विधूर तिला मागणी घालतो. महेशाच्या लग्नाची शक्यता मावळल्यामुळे चंपा या मागणाला मान्यता देते पण केशर तिला या गोष्टीला नकार देते. रंगामास्तरांच्या प्रयत्नामुळे कैलास हा श्रामंत विधूर डॉक्टर जेव्हा मागणी घालतो तेव्हा केशर ती मागणी नाईलाजास्तव मान्य करते. कारण लक्ष्मीकांत या विधूर अपरिचीत मानसापेक्षा कैलास पूर्वपरिचित श्रीमंत डॉक्टर असलेल्या सेवाभावी, संगीताची आवड असलेला तरूण अधिक बरा म्हणून ती मागणीमान्य करते. मागणी मान्य करून जेव्हा ती लोणावळयातील कैलासच्या घरी येते तेव्हा पत्नी म्हणून कैलासशी समरस होण्याच्या कल्पनेने तिला मानसिक त्रास होतो. कारण तिचे महेशावर प्रेम असते व कैलास बद्दल मनात देवा-समान आदर असतो पण नाईलास्तव भाविणीचे कर्तव्य म्हणून ती दुधाचा पेला घेऊन माडीवर जाते-शेवटी "भाविणीची पोर, भाविणच",

देवाची सेवा करायला गेलेच पाहिजे "[3] पण कैलास तिला पत्नी म्हणून न वागवता बहिण म्हणून, महेशाची प्रेयसी म्हणून घरी सांभाळतो. म्हणजे मागणी घालून नेणारे कैलासचे संसारी जीवनही तिच्या वाटयाला येत नाही. भाविणीच्या जीवनातील एखादया पुरूषांशी एकनिष्ठ राहून संसार करण्याचे भाग्य ही तिला लाभत नाही, म्हणून ती अभोगी राहते, म्हणजे केशरला परंपरेने आलेले भाविणीचे जीवन जगावे लागत नाही. महेशाशी प्रेम करून आणि काम करून संसारी जीवन जगण्याची संधीही तिला मिळत नाही. कैलास मागणी घालून ही ती त्याचा पती म्हणून त्या कुटुंबात संसारी सुख उपभोगू शकत नाही. यामुळे तिच्या वाटयाला मानसिक, भावनिक, आणि शारीरिक अतृप्ती आणि असमाधानच येते. केवळ संसार सुखाची सामान्य अपेक्षाही तिची पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून ती अभोगी राहते. आणि हे केवळ ती भाविणीची मुलगी असल्यामुळे तिच्या वाटेला येते.

केशर जरी भाविणीची मुलगी असली तरी मंगेशीला तिच्या कुटुंबात व परिसरात भाविणीची मुलगी म्हणून तिची फारशी कुणी अवहेलना करीत नाही, त्यामुळे बालपणात तिला भाविणीच्या जगण्यातले चटके अनुभवावे लागत नाही. चंपा सारखे परंपरेने येणारे भाविणीचे जीवनही ती स्विकारत नाही. त्या मुळे ते ही दुःख तिला अनुभवावे लागत नाही. तिचे दुःख प्रामुख्याने एक प्रेयसी म्हणून प्रेम भंगातून निर्माण झालेले आहे. ते वैयक्तिक स्वरूपाचे आहे. कादंबरीकाराच्या रंजनवादी भूमिकेमुळेच व कैलासच्या उदात्त व्यक्तिमत्वामुळे तिला सामान्य, संसारी स्त्रीचे जीवनही मिळत नाही. लेखकाने केशरच्या रूपाने जी नायिका उभी केली आहे ती भाविणीची मुलगी प्रेयसी याच अंगाने जाणारी आहे.

महेश :

महेश हा " अभोगी " या कादंबरीचा नायक आहे. कादंबरीतील बहुतेक घटना-प्रसंगात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या त्याच्या मुळे घडतात. केशरचा तो प्रियकरतर आहेच पण त्याच बरोबर तो प्रसिध्द गायक आहे. क्षयाने आजारी पडतो. एकदा तापामुळे त्याचा आवाज जातो. आणि दोन वर्षानंतर आवाज परत येतो. या घटना कादंबरीत अत्यंत महत्वाच्या आहेत. त्या त्याच्या स्वभावातून निर्माण होत नसल्यातरी त्याच्या जीवनात घडलेल्या या घटनामुळे कादंबरीच्या इतर पात्रांवर व त्यांच्या जीवनावर परिणाम होत राहतो. म्हणून हाच कादंबरीचा नायक म्हणावा लागेल. कादंबरीत त्याला महत्वाचे स्थानआहे.

महेश गोव्यातील मंगेशीच्या परिसरातील एका सामान्य कुटुंबातील होता. त्याचे वडील भजन, कीर्तन म्हणणारे गायक होते, ते ेदिष्ट क ाकार होते. हा गायनाचा वारसा त्याला मिळालेला आहे. रंगामास्तरांच्या बरोबरीने तो लहान पणापासून भजनकीर्तनात गायनाला साथ करीत होता. मंगेशीतही वारंवार मंदिरात संगीताचे कार्यक्रम होत. अशा संगीतमय वातावरणात व संस्कारात तो वाढला आहे. लहानपणीच त्याचे आईवडील वारले. त्यामुळे तो पोरका बनलेला आहे. त्याला माता पित्याचे संरक्षण आणि प्रेम फार काळ लाभत नाही. गोपूकाका त्याचा सांभाळ करतात. आई वडिलांविना पोरके मुल म्हणून वडीलांचे एक मित्र रंगामास्तर त्याला पित्याचे प्रेम देतात व आयुष्यभर त्याच्या भल्यासाठी आधार देतात, व प्रयत्न करतात. लहानपणापासून तो चंपाभाविणीच्या केशरशी खेळत वाढला असल्यामुळे चंपा भाविण केशर सारखेच त्याच्यावर प्रेम करते व आईची माया देते. काकीही आई सारखे प्रेम करते.

महेश हा एक असामान्य दर्जाचा गायक आहे. जन्मजात मधूर आवाज त्याला लाभलेला आहे. आवाजाची ही देणगी वंश परंपरेने वडीलांकडून मिळाली आहे. वडिल असताना भजन कीर्तनाचे संस्कार त्याच्या वर झाले आहेत. आणि त्यांच्या माघारी संगीताचे प्राथमिक धडे रंगामास्तरांकडून घेतले आहेत. संगीता विषयाची उपजत आवड त्याला घराण्याचा वारसा आणि मंगेशीच्या परिसराकडून मिळाली आहे पुढे रंगामास्तरांचे एक मित्र नारायण बुवा मंगेशीला आल्यावर महेशाचा आवाज ऐकून व त्याच्या ठिकाणी असलेल्या संगीताचे वैशिष्टय ओळखून त्याला बरोबर घेऊन जाण्याचा निर्णय घेतात. भविष्यकाळात हा एक प्रसिध्द गायक होईल हे नारायण बुवा दूरदृष्टीने ओळखतात, नारायण बुवा महेशाला शास्त्रशुध्द गायकीचे शिक्षण देतात. त्याच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडतात. वेगवेगळ्या मैफीलीत त्याला गायनाची संधी देऊन गायक म्हणून नावलौकिक ही मिळवून देतात, अशा प्रकारे महेश हा एक उत्कृष्ट गायक होतो. विविध शहरात त्याचे गायनाचे कार्यक्रम होतात. ते नारायण बुवाच्या प्रोत्साहनाने आयोजित केले जातात. त्यामुळे महेशाला खूप पैसा व नावलौकिक मिळतो. तो एक श्रेष्ठ दर्जाचा गायक होतो. एकदा तो नारायण बुवा बद्दल कृतज्ञतेने म्हणतो " माझ्या गुरूनं मला खूप शिकवलं, सूर, ताल, राग या सा-याची जाणीव दिली. "[४] त्याला वाटते आपल्या कडून संगीतात नवीन रागाची निर्मिती व्हावी. रूढ गायकी गाण्यात कलावंत म्हणून त्याला समाधान प्राप्त होत नाही. एका प्रसंगी तो स्वत: बद्दल विचार करताना आपण गायक म्हणून कसे घडलो व गायनातल्या आपल्या अपेक्षेबद्दल लिहतो.

" आयुष्य भोगलं, कीर्ति मिळवली,
गाण्याच्या निमित्तानं देशभर फिरता आलं
पण यातून हाती काय गवसलं ?
नारायण बुवांनी तालीम दिली. खूप शिकलो
पण गायलो, ते नारायण बुवांचं गाणं होतं का ?

त्यांचा सूर निराळा, माझा सूर वेगळा
रागदारीचे सूर एकच असतात,
पण गळयातून उमटलेल्या स्वरांनी त्याला केवढं भिन्नत्व लाभतं!
ती आसावरी, तो गंभीर भैरव, ती भैरवी
यात कुठतरी मन रमतं,
आता तो शंकरा, केदार, गाऊ नयेसं वाटतं,
यमनाची वाट तर आता राजरस्ता झाली आहे,
पण या राजरस्त्यावरुन जाता नाही एकाकी वाटतं,
एकाकी!
हां! म्हटलं, तर एकाकी, म्हटलं तर नाही,
नारायण बुवांच्या त्याला तालोमी! पहाटे पाचला
उठायचं रियाज करायचा भल्या पहाटे नारायण बुवा
तालीमी दयायचे का?
भीती एकच! आपले घराणं, आपली गायकी कुणीतरी
ऐकेल,
घराण हे नाव फार खोटं,
राग तेच असतात, सुरावट रुळलेल्या मार्गांनी गेली, की ते
घराण!
गायकी कुठल्याही घराण्याची असू दे, पण यमन, कल्याण
तोडी यांची सूरावट कधी बदलली आहे का?
आविष्कार बदलला
आविष्कार!
घराणं आणि आविष्कार जन्मतो गायकाच्या गळयातून
महत्वाचा असतो, तो सूर! आवाज! आणि त्या कलावंताची
फेक!
एकाच घराण्याच्या दहा गायकांची गाणी ऐकली, तर
नव्या माणसाला ते घराणं कळेल काय?
काही तरी गोंधळ होतो, काहीं समजत नाही

सूरानं बध्द झालेली तीन सप्तकांच्या पलीकडे जाता येत नाही
वाटतं । त्या पलीकडे जावं,
नवेसूर नवे अंदाज गाठावेत, नवे राग जन्माला यावेत
पाठीमागच्या लोकांनी धोरण्यासाठी नव्हे,
त्यांनी असेच काहीतरी निर्माण करावं म्हणून ?
ते नवं शोधायला नवे पंख हवेत,
सुरवंट आपला कोश बांधत, आणि नंतर त्यातून फुलपाखरू
जन्मतं, या फुलपाखराचा जन्म कलावंताला लाभत नसला तर त्या
कलावंताच्या जीवनाला अर्थ काय ?[५]

या प्रदीर्घ अवतरणावरून नवीन रागदारीची नव निर्मिती करण्यापर्यंत गायक म्हणून महेशाचा विकास झालेला आढळतो. कैलासच्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसादिवशी महेशाच्या गायनाचा उत्कृष्ट कार्य क्रम होतो. यामुळेच कैलास महेशावर खूश असलेला दिसतो. मंगेशीच्या मंदिरातील संगीत महोत्सवात तो आपली सेवा सादर करतो या सर्वा-वरून महेश हा एक श्रेष्ठ दर्जाचा गायक आहे हे स्पष्ट होते.

महेश हा प्रसिध्द गायक असल्यामुळे कलावंत म्हणून येणारा अहंकारही त्यांच्या ठिकाणी आहे. हा अहंकार कलावंत म्हणून उपयुक्त असला तरी माणूस म्हणून केशरशी वागताना तो उद्दाम स्वरूपाचा वाटतो. आपण एक असामान्य गायक आहोत आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत याचे भान तो सतत बाळगताना दिसतो. त्याच्या कलावंत म्हणून असलेल्या व्यक्तिमत्वाची ही वैशिष्टये केशरला सहन करावी लागतात.

महेश हा तरुण गायक आहे. तसा तो एक प्रियकर ही आहे. मंगेशीच्या परिसरात बालपणात केशर बरोबर तो खेळला, बागडला, रंगामास्तराच्या भजनकिर्तनात केशर बरोबर साथ केली आहे या सहवासामुळे

केशरवर त्याच्या मनात प्रेम आहे. तो क्षयाने आजारी पडल्यानंतर केशर त्याची मंगेशी व लोणावळयाला सेवा करते. त्या वेळी तो सांगतो, " माझ्या जीवनात एक गाणे व तू महत्वाची आहे." [6] बरा झाल्यावर आपण लग्न करू असेही तो सांगतो. भाविणीची मुलगी म्हणून केशरचे प्रेम त्याने जणू गृहीत धरले आहे. तपशीलाने तो कृतीतून फारसे प्रेम व्यक्त करीत नसला तरी ही त्याचे केशरवर प्रेम आहे. या प्रेमापोटीच तो केशरवर रागवतो, चिडतो, प्रसंगी वाटेल तसे बोलतो. केशर केवळ आपली असावी अशी त्याची अपेक्षा आहे. केशर काही वेळेला कैलासच्या घरातील स्वच्छता आणि कामधाम करते. त्याच्याबरोबर मुंबईला खरेदीला जाते. या गोष्टी त्याला आवडत नाहीत, काही वेळेला त्याच्या मनात संशयही निर्माण होतो. मुंबईला त्यालाच कपडे खरेदी करण्यासाठी कैलास केशरला घेऊन जातो. पण हे त्याला आवडत नाही परत आल्यावर आपण काय काय खरेदी केली हे उत्साहाने केशर सांगत असताना " कैलासचा मोठेपणा तुमच्या कधीच लक्षात येणार नाही." असे म्हणते तेव्हा " मग कैलासला सोडून वारूळाला मिठी कशाला घालतोस ?" [7] असे उद्गार तो काढतो. यातून त्याचा संशयच दिसून येतो. केशर डॉक्टरांचे उपकार मानून त्यांचे लहान सहान कामे करते, रूग्णाची सेवा करते, यामुळे केशर कैलासकडे आकर्षित होत आहे की काय ? अशी एक अंधूक शंका ही त्याच्या मनात आहे. अशा प्रकारे तो संशयी वृत्तीचा चित्रीत केला आहे.

महेशाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोण पारंपरिक पुरूषी मनोवृत्तीचा आहे. स्त्रियांचा जन्म हा पुरूषाची सेवा करण्यासाठीच असतो आणि स्त्रियांनी भोगदासी म्हणूनच वावरावे अशी अपेक्षा असते. केशरकडे तो भाविणीची मुलगी म्हणूनच पाहतो. तिने मंगेशीच्या मंदिरातील गायन प्रसंगी म्हटलेल्या गौळणीबद्दल " अदा करून म्हणायला ठीक आहे." [8] अशी अवहेलना करतो. तिच्या गायनाबद्दल त्याला कौतुक वाटत नाही. एका प्रसंगी त्याला जेवण द्यायला उशीर होतो. तेव्हा तो केशरचा आईवरून उध्दार करतो. ते जेव्हा केशरला सहन होत नाही.

तेव्हा "व्वा! स्वदा घमेंड! भाविणीच्या पोरीला ?"[९] असा भाविण म्हणून अधिक्षेप करतो. भाविणीच्या मुलीने किंवा भाविणींनी समाजाची सेवा मनोभावे करावी अशी त्याची अपेक्षा आहे. आजारपणात केशरने भक्तिभावाने त्याची सेवा केली तरी " त्यात नवल कसलं ? भाविणीच्या पोरीनं ती शिकवणं असतंच ?" असे तो डॉक्टरांना सांगतो. भाविणी या एका पुरुषाशी एकनिष्ठ नसतात. हौशी आणि श्रीमंताकडे त्या आपली सेवारुजू करतात. दर वेळी नवे हौशी धनी शोधित असतात, असा एक समज भाविणी बद्दल आहे. त्यामुळे तो केशरला म्हणतो", तुमची भाविणीची जात, वाहत्या पाण्याकडे झुकणारी."[११] भाविणीच्या मुली उपभोगा-साठीच असतात. त्यांना लग्नाची गरज नसते अशी त्यांची समजूत आहे. या सगळ्यावरुन भाविणीकडे पाहण्याचा त्याचा पारंपारिक दृष्टीकोणच दिसून येतो. केशरला तो माणूस म्हणून स्वतंत्र व्यक्तिमत्वाची स्त्री म्हणून फारशी किंमत देत नाही तिने केलेल्या सेवेचा, त्यागाचा व घेतलेल्या कष्टाची तो जराही कदर करीत नाही. तिने केलेल्या सर्व गोष्टी तो कर्तव्य समजतो. प्रेयसी म्हणूनही तो तिला पुरेसा सन्मान देत नाही. यावरुन स्त्रियांकडे विशेषत: भाविणीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोण दिसून येतो.

महेश हा प्रसिध्द गायक आहे. देशभर केलेल्या कार्यक्रमातून जो पैसा मिळतो तो आपले गुरु व काकांना संपूर्ण वाटून टाकतो, आपल्या भविष्यकाळासाठी तो स्वत:कडे थोडाही पैसा ठेवत नाही, त्यामुळे क्षयाने आजारी पडल्यानंतर त्यांची आर्थिक ओढाताण होते. आवाज गेल्यावर तर आर्थिक दृष्टया त्याला अत्यंत हाल सहन करावे लागतात. केशरशी लग्न केल्यानंतर भविष्य काळात जो संसार उभा करायचा असतो-त्याची काहीच तरतूद तो करीत नाही. अशाप्रकारे अनेक कलावंतासारखा तो अव्यवहारी वाटतो.

महेश अलौकिक गायक असला तरी कैलासच्या तुलनेत एक सामान्य माणूसच वाटतो. कैलासचे माणूस म्हणून जे श्रेष्ठपण आहे ते श्रेष्ठपण त्याला कधीही लाभत नाही. तो अंहकारी, संशयी व चिडखोर आहे. आणि तापट आहे तो स्वत:वर अधिक प्रेम करतो इतरांच्या मनाचा, त्यांच्या भावभावनांचा तो विचार करीत नाही. कैलासकडे जी सेवाभावी, ध्येयवादी, त्यागाची वृत्ती असते त्याचा लवलेशही महेशमध्ये आढळत नाही. केशरने त्यासाठी एवढया हालअपेष्टा सहन केल्या तरीही तो तिच्या प्रेमाची, त्यागाची, सेवेची कोणतीच कदर ठेवत नाही यामुळेच कादंबरीच्या शेवटी त्याला स्वीकारत नाही. म्हणून त्याच्या जीवनाची शोकांतिका होते व महेशही अभोगी राहतो.

कैलास :

" अभोगी " या कादंबरीमध्ये महेश इतकेच कैलास हे पात्र महत्वाचे आहे. जणू तो या कादंबरीचा प्रतिनायकच आहे. नायकाकडे आवश्यक असणारी रूप, गुण, वैशिष्टये त्यांच्याकडे आहेत. पण कादंबरीतील बहुतेक प्रसंग महेशमुळे घडतात म्हणून त्यालाच नायक म्हणावे लागते. कैलास केशरला मागणी घालतो व तिला बहिण म्हणून मानतो. हीच कादंबरीतील महत्वाची घटना त्यामुळे घडते म्हणून त्याच्या जीवनाची बरीचशी कहाणी त्यांच्या निरूपणात येत असलो तरी तो या कादंबरीचा नायक ठरु शकत नाही. पण महेश इतकेच महत्वाचे पात्र आहे.

कैलास हा रूबाबदार व्यक्तिमत्वाचा तरूण आहे. " रूपाने देखणा उंचपूरा होता. त्यांच्या निळसर डोळ्यात एक आत्मविश्वासही दिसत असे हा डॉक्टरी पेशा ऐवजी सिनेमात गेला असता तर उत्कृष्ट व्यक्तिमत्वाचा हिरो शोभला असता असे वर्णन कादंबरीत आले आहे. कुणाही माणसावर छाप पडावी असे त्याचे बाहय व्यक्तिमत्व आहे. तरूण, सुशिक्षित, सुसंस्कृत, सेवाभावी, उच्चप्रतिचे वैदयकिय ज्ञान घेतलेला, कर्तव्यदक्ष, समंजस, गोरगरीबांसाठी वैदयकिय सेवा पुरविणारा असा संगीतावर प्रेम करणारा स्त्रियांकडे निकोप दृष्टीने पाहणारा अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची

विलोभनीय वैशिष्टये कादंबरीतून चित्रीत झाल्या आहेत.

कैलास हा मुळचा मुंबईचा. एका श्रीमंत जवाहि-याचा मुलगा आहे. कमलाकर हे त्याचे वडिल. हे हि-याचे पारखी आणि मोठे व्यापारी होते. त्याची आई वयाच्या दहाव्या वर्षी वारली. त्याचा संभाळ वडिलांनी केला. घरात गर्भश्रीमंती होती. मेडीकलचे शिक्षण पूर्ण केल्यावर कमलाकरांनी त्याचा विवाह त्यांच्याच एका जवाहि-याच्या मुलीशी उल्काशी करुन दिला. लग्न झाल्यानंतर तो उच्च शिक्षणासाठी तीन वर्ष इग्लंडला राहिला होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर दुर्दैवाने त्यांची पत्नी उल्का क्षयाने वारते. वडिल कमलाकरही हृदयविकाराने वारतात. जवळच्या प्रिय माणसांच्या मृत्युच्या आघाताने त्याच्या जीवनात प्रचंड दु:ख निर्माण होते. त्याला एकाकीपण येते. यातून सावरण्यासाठी तो लोणावळयाला मोठे " उल्का निवास " नावाचे रूग्णालय काढतो व तेथे गोरगरीबांची वैद्यकीय सेवा निष्ठेने करतो. या पाठीमागे त्याचा उदात्त ध्येयवादी होता, असा एक श्रीमंत कुळातील उच्च विद्या विभूषित असा जनसेवेची आवड असलेला तज्ञ डाक्टर आहे. कैलास उच्च विदयाविभुषित शल्य विषारद, आहे. आपली पत्नी डोळयादेखत क्षयाने वारल्याचे पाहून व वडिल हृदविकाराने वारल्यामुळे गोर-गरीबांना लोणावळया सारख्या आडबाजूच्या माळरानात वैदयकिय सेवा उपलब्ध करुन दयावेत म्हणून तो " उल्का निवास " नावाचे सर्व सोयीने युक्त असे रूग्णालय उभारतो. त्या माध्यमातून तो लोकांच्यासाठी वैदयकिय सेवा उपलब्ध करुन देतो. डॉक्टरी व्यवसायावर त्याची पूर्ण निष्ठा आहे. एकदा अपघातातील एक रूग्णाचे ऑपरेशन तो आपले वैद्यकिय ज्ञानपणाला लावून निष्ठेने करतो या बद्दल केशर अभिनंदन करायला आणि असताना आपण त्या रूग्णाला जीवदान दिले असले तरी मेंदूतील काही तसा निकामी झाल्यामुळे तो सोळा वर्षाचा तरूण कोणालाही ओळखू शकत नाही.

यातून एक तज्ञ डॉक्टर म्हणून त्याचे प्रयत्न जसे दिसतात तसे नियतीने दिलेले अपयश ही तो मान्य करतो. वैद्यकिय व्यवसायातील यश-अपयशाची चांगली जाणीव आहे. प्रयत्न करून ही प्रसंगी रुग्ण दगावू शकतात याचेही त्याला भान आहे. क्षय रोगाने रूग्णालयात आलेली एक मुलगी तो वाचवू शकत नाही. एकदा अपघातातील रुग्णाचा अर्धा पाय त्याला काढावा लागतो. अपंगत्वापासून त्याची सुटका करता येत नाही. मंगेशीला अभिषेक करतानाही त्याला कर्तव्यभावनेने केलेले ऑपरेशनच आठवते. आपली पत्नी जशी क्षयाने वारली तसा श्रेष्ठ दर्जाचा गायक असलेला महेश सुध्दा क्षयाने जाऊ नये म्हणून तो रंगा-मास्तरांनी पाठवलेल्या पत्रावरून येऊन उपचार करतो व त्याला लोणा-वळयाला पुढील उपचारासाठी घेऊन येतो. या सर्वावरून तो एक निष्णात सेवाभावी कर्तव्यनिष्ठ डॉक्टर असलेला दिसतो.

कैलास हा रसिक आहे संगीताची त्याला अभिजात आवड आहे. उल्काही त्याची पत्नी चांगली सतार वादक आहे. तिच्या मृत्यूनंतर ती सतार तो तिची आठवण म्हणून जपून ठेवतो.ती हाताळण्याचा प्रयत्न करतो. लग्नाच्या पहिल्या वाढदिवसादिवशी तो महेश सारख्या मान्यवर गायकाची मैफील आयोजित करतो. महेशावर उपचार करताना त्याची भावना

" गायक निर्माण करता येत नाही "[१२]

अशीच असते. केशरच्या गायनाचे तो कौतुक करतो. कलावंताबद्दल आदर बाळगतो.त्यांनासुविधा पुरवितो. केशर व महेशसाठी तो दोन तानपूरे व सूरपेटी आणून देतो या सर्वावरून त्याला संगीताची आवड होती हे स्पष्ट होते.

कैलास हा मुंबईसारख्या नागरी भागात वाढलेला आणि इंग्लंड मध्ये शिकून आलेला असल्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन उदात्त असलेला दिसतो. उल्का नावाच्या मुलीशी त्याने लग्न केले आहे.

लोणावळयाला प्रथमत: आपला बंगला दाखवताना, लोणावळयाच्या उंच टेकडीवरील छोटीशी बाग दाखवताना आणि मंगेशीला जाताना अशा तीन वेळीच त्याचे प्रेम आले आहे . यातून त्याचे उल्कावर असेलेले उत्कट प्रेम चित्रित केले आहे. उल्का क्षयाने आजारी असल्याचे कळताच तो इंग्लडवरुन तिला भेटण्यासाठी येतो तिच्या मृत्युनंतरही त्याला खूप दु:ख होते. उल्काच्या जाण्यानंतर त्याच्या जीवनात प्रचंड पोकळी आणि एकाकीपणा निर्माण होतो. तो तरुण श्रीमंत असूनही आणि कुणीही त्याला दुस-या विवाहासाठी मुली देण्याची शक्यता असूनही

दुसरे लग्न करीत नाही. उल्काच्या प्रेमासाठी तो तिच्या नावाचे रुग्णालय काढून लोकांची सेवा करणे पसंत करतो. वारंवार त्याला उल्काची आठवण होताना दिसते यावरुन त्याचे पत्नी प्रेमच दिसून येते.

मंगेशीला असलेल्या बंगल्यामुळे त्याचा भाविणीच्या जीवनाशी संबंध येतो. चंपा या भाविणीकडे त्याच्या मंगेशीच्या बंगल्याची व्यवस्था असते. चंपा या भाविणीच्या मुलीशी संबंध आल्यावर तो तिला कधीही भाविणीची मुलगी म्हणून हीन लेखताना दिसत नाही. उलट तिला एक गुणी मुलगी म्हणून आदराने व सभ्यतेने वागणूक देतो. महेशचा आवाज गेल्यावर तो निघून जातो. आणि रंगामास्तरांच्या विनंतीवरुन तो केशरला मागणी घालतो. मागणी घालून आणलेल्या केशरला त्याने रखेली म्हणून वागवीली असते तरीही रुढ समाजात त्याला कुणीही नावे ठेवली नसती पण तो तिला बहिण संबोधतो आणि महेशची अमानत म्हणून तिला वागणूक देतो. फक्त एकाच प्रसंगी केशर रात्री अपरात्री भेटल्यावर केशरला तो म्हणतो, " मी ही माणूस आहे, मला ही भावना आहेत, माझ्याही जीवनात एकाकीपण आहे....परत कधीही माझ्या खोलीत येऊ नको निदान मी एकटा असताना."[13]

यात त्याच्या मनातील भावना व्यक्त होतात. पण एका भाविणीच्या मागणी घालून आणलेल्या मुलीला बहिण मानण्याचे मोठेपण त्यांच्या ठिकाणी आहे. चंपाभाविणीला व केशरला तो कुठेही स्त्री किंवा भाविण म्हणून हीन दर्जाची वागणूक देताना दिसत नाही या-वरून त्याचा स्त्रीविषयक दृष्टीकोनच दिसून येतो.

कैलास हा सर्वगुण संपन्न नायक वाटावा असाच चित्रीत केला आहे. तो तरुण श्रीमंत डॅाक्टर आहेच पण समंजस मनमिळावू, प्रेमळ, सेवाभावी समजूतदार आहे. महेश, अनेकदा आजारपणात चिडून त्याला वाटेल तसे बोलतो पण ते तो सहन करतो. केशरचे दुःख ही तो समजाऊन घेऊन प्रेमाने आधार देतो, कैलासला सर्व परिस्थिती अनुकूल असतानाही तो जीवनात अभोगी राहतो. रूग्णावरही तो प्रेम करतो या त्याच्या गुण वैशिष्टयामुळे तो केशरच्या आणि रसिकाच्याही आदरास पात्र ठरतो.

लेखकाने त्यांच्या स्वभावातील दोष चित्रित केलेले नाहीत. सर्व गुण संपन्न नायक वाटावा असेच त्याचे व्यक्तिमत्व कादंबरीभर उभे राहाते.

चंपा :
------

चंपा ही या कादंबरीतील भाविण व केशरची आई आहे, पण केशरने भाविणीचे जीवन स्वीकारु नये असा विचार करणारी आहे. तिला महेश व केशरची मैत्री मान्य आहे. त्या दोघांनी लग्न करावे असे-ही तिला वाटते. म्हणून ती केशरला महेशाची सेवा करु देते.

केशर एकटीच लोणावळयावरुन परत आल्यावर तिच्या काळजीने तिच्या भवितव्यासाठी तिने भाविण होण्यापेक्षा विवाह करावा म्हणून ती लक्ष्मीकांत सारख्या विधूराची मागणी मान्य करते.

केशार मान्य करीत नाही. तेव्हा तिला चंपा विचारते विवाह न करता भाविण होणार आहे का ? व भाविणीचे जीवन सांगते.

" देवाची सेवा करायची, पालखीपुढे नाचायचे,
आरतीच्या वेळी भिंतीला पाठ टेकवून उभे राहायचे,
पुजा-याने दिलेला विडा घ्यायचा, कुणी हौशी धनी
मिळाला तर घरी घेऊन यायचे, त्यांची संगत करायची
आयुष्यभर हेच करीत राहायचे आणि म्हातारपणी
अनेक रोगांनी पछाडलेलं हे शरीर त्या समोरच्या कुंडात
लोटून द्यायच असलं आयुष्य का तुला पत्कारायचंय ?"[१४]

भाविणीची वास्तवता तिचे दुःख, समाजातील तिचे स्थान चंपाच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. मात्र चंपाचेही भाविण म्हणून दुःख चित्रित केलेले दिसत नाही.

गोपूकाका :
----------

गोपू काका महेशाचे सख्ये काका. वास्तव जीवनातील व परंपरागत पुरूष पात्र म्हणून काकांचे व्यक्तिचित्रण बरे रंगवले आहे. पहिल्यापासून स्वार्थी, पैशाचे लोभी आहेत.

महेश मंगेशीला आल्यावर तो केशारच्या घरी जातो, मग स्वतःच्या घरी येतो तेव्हा काका म्हणतात, " छान ! आल्या बरोबर भाविणीची घरं शोधलीत ना ? गाण्याबरोबर हे ही शिकून आलात, वाटते ? "[१५]

महेश आजारी असताना कीर्तनाला जातो व ताप घेऊन येतो तेव्हा केशार त्याला आधार देऊन घरी आणित असते तेव्हा काका बघतात व म्हणतात,

" अरे शिंच्यानो ! दिवसाचा देव उघड्या डोळ्यांनी बघतोय, त्याची तरी लाज बाळगा, ही बोलून चालून भाविणीची पोरं, तिला नसेल लाज, पण तू ! तू तरी बाळग, दिवसा ढवळ्या मिठ्या

मारुन चालाय लागलाय ? लोक थुंकतील, हो ! तुमच्या अंगावर नव्हे....माझ्या![16] पूर्ण कादंबरीत एकच असे पात्र आहे की त्यांना भाविणीबद्दल तिरस्कार वाटतो. समाज नाहीतरी भाविणीकडे वाईट दृष्टीनेच बघतात किंवा त्यांना कमी लेखतात.

रंगामास्तर :

रंगा मास्तर महेशाच्या वडिलांचे मित्र.त्यांचा मुलगा व पत्नी त्यांच्या डोळ्यादेखत वारले. त्यामुळे ते स्वत:ला भजन कीर्तनात गुंतवून घेतात. महेश व केशरवर ते मुलांप्रमाणे प्रेम करतात. ते सतत दुस-यासाठी झटतात.

केशरला ते मुलीप्रमाणे प्रेम करतात म्हणून ते तिला भावीण म्हणून पाहत नाहीत. केशरला मागणी आल्यावर केशर सरळ रंगामास्तरांना विचारते.

" मी रखेली बनू ? "[17] केशरनेजीवाचे बरे वाईट करून घेऊन नये म्हणून म्हातारपणाची लाज न बाळगता कैलासचे पाय धरतात व कैलासला केशरला मागणी घालण्यास भाग पाडतात.

"अभोगी"कादंबरीतील इतर पात्रे :

भोला :

भोला,रामनाथ हे दोघं कैलासच्या बंगल्यावर नोकर असतात. लोक केशर बद्दल बोलतात हे एकदाच ते चर्चा करतात.

काकी, उल्का, कांचनताई हीपात्रे या कादंबरीत आली आहेत. बलिंगा व मलैत्रा हे दोघे कैलासचे मित्र म्हणून डॉक्टर आले आहेत. नवीनदास, कमलाकर व लक्ष्मीकांत हे ही पात्रे " अभोगी " या कादंबरीत आले आहेत.

" अभोगी " या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचा विचार केला. कादंबरीतील व्यक्तिचित्राद्वारेच कादंबरीतील जीवनाशय रसिकांना समजतो यानंतर अभोगी या कादंबरीतील संघर्षाचा विचार करून

" अभोगी " या कादंबरीतील संघर्ष :

"अभोगी" या कादंबरीतील संघर्ष हा स्थूलमानाने व्यक्ती विरूद्द व्यक्ती व विशिष्ट प्रसंगातील व्यक्तिची मनस्थिती अशाच स्वरूपाचा आहे. खरे तर भाविणीच्या मुलीच्या जीवनावर लिहलेल्या या कादंबरीत व्यक्ती विरूद्द समाज, धार्मिक रूढी, परंपरा असा असायला हवा होता पण ही कादंबरी भाविणीच्या सुख-दुःखावर व्यथा-वेदनावर फारशी प्रकाश टाकीत नाही. ती भाविणीचे जीवन गंभीर आणि वास्तववादी पद्दतीने साकार करणारी कादंबरीच नाही. तिचे स्वरूप प्रामुख्याने रंजनवादी प्रेमकहाणीचे असल्यामुळे तिच्यातील संघर्ष ही तशाच वरवरच्या पद्दतीचा आहे.

केशर ही भाविणीची मुलगी म्हणून परंपरेने भाविण आहे. पण तिला रूढ पद्दतीचे भाविणीचे जीवन स्वीकारावे लागत नाही. तिचे महेशावर प्रेम आहे. त्याच्याशी तिला विवाह करून संसार करण्याची इच्छा आहे. पण महेशाचाविशिष्ट स्वभाव,त्याचा भाविणीकडे पाहण्याचा दृष्टीकोण आणि त्याच्या जीवनात क्षयाचा आजार व आवाज जाण्याचे जे दु:ख निर्माण होते. त्यामुळे केशरच्याही जीवनाची ससेहोलपट होते. तिचे दु:ख प्रामुख्याने प्रेम, संशय आणि प्रेम भंग यातून निर्माण झाले आहे. भाविणीची मुलगी म्हणून कैलासने मागणी घालून लोणावळयाला जाताना तिला मानसिक दु:ख होते पण तिच्या वाटेला भाविणीचे जगणे येत नाही. त्यामुळे भाविणीच्या जीवनातील पारंपरिक दु:ख आणि ससेहोलपट तिला अनुभवावी लागत नाही. म्हणून मधून मधून महेश कडून भाविणीची मुलगी म्हणून तिची अवहेलना होते इतकेच त्यामुळे केशरच्या जीवनातील दु:ख धार्मिक वा सामाजिक परिस्थितून निर्माण झालेले नसून ते वैयक्तिक स्वरूपाचे अधिक वाटते.

महेश आणि कैलास मधील संघर्ष ही असाच तात्कालीक स्वरूपाचा आणि वरवरचा आहे. आजारपणात महेश व केशर लोणावळयाला आल्यावर केशर आणि कैलासच्या मनमोकळया संबंधाने महेशाच्या

मनात संशय निर्माण होतो. आवाज गेल्यानंतर महेश निघून गेल्यावर कैलास मागणी घालून केशरला घेऊन येतो यामुळे ही महेशाच्या मनात कैलास विषयी आकस आणि द्वेष वाटतो पण हा द्वेष गैरसमजातून निर्माण झालेला आहे. केशरला कैलासने बहिण म्हणून वागवले आहे व एका विशिष्ट परिस्थितीत त्याला मागणी घालणे आवश्यक ठरले याचा उलघडा झाल्याबरोबर हा संघर्ष मिटतो. या कादंबरीत सुष्ट दुष्ट स्वरूपाचा खलनायक स्वरूपाचा संघर्ष आलेलाच नाही. वेगवेगळ्या प्रसंगी व्यक्तीच्या मनात जे भावनिक संघर्ष निर्माण होतात ते वैयक्तिक स्वरूपाचे आणि तात्कालिक असेच आहे. एकंदरीत "अभोगी" मधील संघर्ष हा गंभीर स्वरूपाचा वास्तववादी वाटत नाही तर तो रंजनवादी कादंबरीतील वरवरचा तात्कालीक आणि तकलादू स्वरूपाचा वाटतो.

अभोगीतील संघर्ष हा व्यक्ति विरूध्द व्यक्तीमधील गैरसमज अशा स्वरूपाचा आहे ते आपण पाहिले तो संघर्ष हा नावापुरता मर्यादित स्वरूपाचा असतो गैरसमज दूर झाला की संघर्ष संपतो. या नंतर आपण " अभोगी " या कादंबरीतील वातावरण निर्मिती कशी केली याचा थोडक्यात विचार करू.

"अभोगीतील वातावरण"

कादंबरीतील कथानक व व्यक्तिचित्रणे उठावदार होण्यासाठी वातावरणाची आवश्यकता असते. त्यात धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक भौगोलिक व नैसर्गीक वातावरणाची निर्मिती कथानकाच्या पार्श्वभूमीसाठी होते,

" कादंबरीत योग्य ते वातावरण निर्माण करण्यात जर ग्रंथकारास यश लाभले तर कथानकातील विविध प्रसंग आणि घटना यामधील कार्यकारण भावाची संगती सहज प्रकट होऊन व्यक्तिदर्शनाचे खरे मर्म ही वाचकास सुलभ रितीने प्रतीत होते. स्थलकाल वैशिष्ट्याचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच वातावरण होय". [१८]

अभोगी या कादंबरीत रणजित देसाई यांनी भाविणीचा विषय घेऊन कादंबरी लिहिली. " भाविण " ही मंगेशीला सोडलेली एक स्त्री. ही परंपरा परंपरागत चालू आहे. परंतु या कादंबरीत धार्मिक दृष्टीने भाविणीचा प्रश्न मांडला नाही. भाविणीचे जीवन तिला धार्मिकतेमुळे होणारे दुःख याचे चित्रण कादंबरीत आले नाही. भाविणीची मुलगी भाविण अशा पध्दतीने ही परंपरा चालू आहे, याचे चित्र ठळकपणे आले नाही. चंपा भाविणीची मुलगी केशर म्हणून तिला दुःख येते व तेही प्रेमभंगातून, एवढेच भाविणीचे दुःख आले आहे.

भाविण ही प्रथा पुरातन काळापासून चालू असल्यामुळे हा एक सामाजिक प्रश्न आहे. कारण भाविणीकडे एक भाविण म्हणून पाहिले जाते. समाजात तिला मानाचे स्थान नसते. अभोगी कादंबरीत चंपा भाविण आहे. चंपाची मुलगी केशर म्हणून तिला भाविण म्हणतात. पण तिने भाविणीचे जीवन स्वीकारले नाही. गोपूकाका भाविण म्हणून उल्लेख करतात व महेश केशरला " भाविणीची पोर " म्हणून बोलतो. पण तेही त्याचे तिच्या वर प्रेम असते म्हणून. तसे या कादंबरीत भाविणीचे समाजातील स्थान, तिला मिळणारी वागणूक तिचे दाहक जीवन ठळकपणे आलेले नाही.

या कादंबरीतील कौटुंबिक चित्र तसे आले नाही. कैलासचे कौटुंबिक जीवनाचे चित्र त्याच्या आठवणीच्या स्वरूपात आपल्या समोर येते. तर केशरच्या कौटुंबिक जीवनाचा विचार केला तर चंपा ही भाविण असते. व तिची मुलगी केशर हेच चित्र दिसते. महेशचे आई वडिल लहानपणीच वारल्याने त्यांचा सांभाळ काका-काकूने केल्याने त्यांचे ही कौटुंबिक चित्र आले नाही. केशरही भाविणीची मुलगी महेशची आजारपणात सेवा करीत असते. तेव्हा काका तिला घरी येते म्हणून बोलतात. थोडी तरी लाज बाळगा"[19] किंवा भाविणीची घरं पुजून आलात का ? "[20]

भाविणीचा परंपरा मंगेशीच्या परिसरात चालू आहे. मंगेशीच्या परिसरामुळे गोव्याचे चित्रण आले आहे व कैलासचा लोणावळयावर दवाखाना असल्याने गोवा, व लोणावळा या निसर्ग रम्य ठिकाणाचे

चित्र थोडक्यात आले आहे. कारण अभोगी ही कादंबरी सुरुवातीस चित्रपटसाठी पटकथा लिहल्याने निसर्गाचे ठळक चित्रण आले नाही. कैलासचे उल्काशी लग्न झाल्यावर ते मंगेशीला व लोणावळयाला जातात व जाताना निसर्गाचे वर्णन येते ते ही कैलासच्या आठवणी स्वरूपात येते.

महेशाचा आजार वाढल्याने कैलास त्याला लोणावळयाला आणतो तेव्हा केशरही येते. एकदा केशर महेशाला फिरायला नेते, तेव्हा डोंगराचे वर्णन आले आहे. " इथे खोल द-या नाहीत, इथं प्रसन्न हिरवगार खुरटया गवतानं सजलेल्या टेकडया आहेत." [२१] या कादंबरीत भाविणीचा सामाजिक प्रश्न जरी घेतला तरी त्या वास्तव चित्रणाचे अवास्तव दर्शन घडवले आहे. ही संपूर्ण कादंबरी रंजनवादी आहे. यात संगीताचा वापर करून कादंबरीला काल्पनिक बनवले आहे. यातील महेश, केशर, कैलास, रंगामास्तर या सर्व पात्रांना संगीताचे वेड आहे व ते सर्वजण संगीतावर प्रेम करतात. महेशातर गायक आहे व तो आवाजामुळे व आवाजासाठीच जगतो. आवाज गेल्यावर तो निघून जातो. कैलास तर पत्नी वारल्यावर तिच्या प्रेमामुळे व संगीताच्या आवडीमुळे तिची सतार आयुष्यभर छेडत राहतो. केशर ही शेवटी कैलास जवळच राहते. सर्वच पात्रे संगीताच्या कल्पनारम्य वातावरणात जगतात.

"अभोगी "या कादंबरीतील वातावरणाचा विचार करता असे दिसते की ही कादंबरी चित्रपटासाठी पटकथा लिहिल्यामुळे यातील कुठेच वातावरण ठळकपणे चित्रीत झाले नाही. कौटुंबिक चित्रण तर गतकालीन आठवणीच्या स्वरूपात आले. सामाजिक चित्र सामाजिक म्हणून आले नाही, कारण ही संपूर्ण कादंबरी एक रंजनवादी प्रेमकथाच आहे. याचप्रमाणे निसर्गाचे चित्रण जाता जाता येते. अशा पध्दतीने " अभोगी " या कादंबरीत वातावरणाची निर्मिती केली आहे.

" अभोगी " कादंबरीतील भाषाशैली

रणजित देसाई हे मराठीतील एक लोकप्रिय लेखक आहेत. "श्रीमानयोगी", "राधेय" या त्यांच्या गाजलेल्या कादंबरीने मन रसिकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. लेखक म्हणून त्यांच्या यशास्वितेत त्यांच्या भाषाशैलीचाही महत्वाचा वाटा आहे. एखादा प्रसंग ते सहजतेने जीवंतपणे आपल्यासमोर साकार करतात. चित्रमयता, संवादात्मकता, काव्यात्मकता, आणि सहजता ही त्यांच्या भाषाशैलीचे काही प्रमुख वैशिष्टये म्हणून नोंदवता येतील.

" अभोगी " ही कादंबरी मुळात पटकथा म्हणून लिहिली असल्यामुळे तिच्यात दृक-श्राव्यता किंवा संवादात्मकतेवर जास्त भर आढळतो. हे संवाद, तुटक, छोटे-छोटे आणि लहान-सहान प्रसंगाची दृश्यरूप मालीकाच वाटावी अशा स्वरूपाचे आहेत. लंडनचा तो प्रसिध्द हॉल, लता मंगेशकरांचा कार्यक्रम, उल्का आजारी असल्याचा फोन, लंडनचे विमानतळ, विमानातला प्रवास, या प्रवासात कैलासला आठवणारे पूर्व जीवन, वडिल, उल्का, उल्का व कैलासच्या लग्नाच्या वाढदिवसाचा महेशाचा कार्यक्रम, मुंबईमध्ये उल्काला भेटणे इ. प्रसंगाची मालीकाच ते आपल्या समोर शब्दरूपाने दृश्यात्मक पध्दतीने उभी करतात. म्हणून या कादंबरीच्या भाषाशैलीचे पहिले आणि महत्वाचे वैशिष्टय म्हणजे कॅमेरा सारखी दृश्ये टीपण्याची चित्रमयता हेच होय.

ही कादंबरी चित्रपट कथा म्हणून लिहली असल्यामुळे तिच्या अभिव्यक्तीला जे रूप प्राप्त झालेले आहे ते प्रामुख्याने संवादात्मक स्वरूपाचे आहे. संपूर्ण कादंबरी जणू संवादात्मक पध्दतीने साकार झाली आहे. उदा. महेश आजारी असताना लोणावळ्यात केशर, कैलासच्या रूमची स्वच्छता करते. त्या वेळचा प्रसंग.

" एकदा अशीच ती कैलासच्या खोलीमध्ये असताना महेशाची हाक आली, केशर धावत आली, महेश संतप्तपणे खोलीत येरझा-या घालीत होता. केशरला पाहताच त्यानं विचारलं,

" कुठं होतीस ? "

" बाहेर होते "

" खोटं ! जिन्यावरनं उतरलेली पावलं मी ऐकली आहेत. डॉक्टरांच्या खोलीतनं आलीस, नव्हे ? "

" हो. "

" काय गरज होती "?

महेशाच्या डोळ्याला डोळा भिडवत केशर शांतपणे म्हणाली,

" त्यांच्या खोलीची आवराआवर करते."

"त्या भोलाचे हात मोडलेत "?

" त्यांचे मोडले नाहीत, पण माझेही धडधाकट आहेत."

" अरे व्वा ! इथवर मजल गेली ? बरोबर आहे, बोलून चालून भाविणीची पोर, कुळाचार विसरेल कशी "?[22]

याचप्रमाणे महेशाच्या आजाराचे क्षय रोगाचे निदान कैलासने केल्या-नंतरचा प्रसंग.

२." केशर, इथं अश्रू ढाळून काही उपयोग नाही आणि यात हताश होण्यासारखंही काही नाही मी तुम्हांला वचन देतो. वर्षाच्या आत मी महेशाला बरं करीन, ती जबाबदारी माझी "

" जबाबदारी ! " महेश तुच्छतेनं हसला,

" का हसलात ? "

" एक विचारू," डॉक्टर "

" विचारा ना ? "

" तुमच्या पत्नी टी. बी. नं वारल्या ना"?

" महेश." केशव उद्गारली

पण तिकडे लक्ष न देता महेश म्हणाला,

" मग त्यांना का नाही बरं केलेत ? "[23]

या सारखे लहान सहान प्रसंग संवादात्मकतेतून साकार होतात. या संवादात्मकतेतून व्यक्ती त्यांचे दृष्टीकोण, त्यांच्या भावभावना,

दुःख, वृत्ती-प्रवृत्ती, लेखकांनी सहजतेने साकार केल्या आहेत. यामुळे कादंबरी वाचनीय तर झालीच पण ती गतीमान-ही झाली आहे. वाचकाला विश्वासात घेऊन त्यांची उत्कंठा वाढवत नेण्याचें कसब रणजित देसाई यांना साधले आहे.

ही कादंबरी गोवा आणि लोणावळा या परिसरात घडते. पण वर उल्लेखलेल्या पटकथेच्या दृश्यात्मकता व संवादात्मकता यामुळे यात शब्दरूपाने येणारी विपुल निसर्ग-वर्णने आढळत नाहीत. केशर, महेश, कैलास, उल्का, ही पात्रे निसर्गावर प्रेम करणारी व निसर्गात रमणारी असली तरी त्यांच्या वर्णनातून तुटकपणे निसर्ग चित्रण आले आहे.

महेश थकल्यामुळे आराम करण्यासाठी मंगेशीला येतो. त्यावेळी रात्री त्याला दिसलेल्या गोव्यातील निसर्गाचे वर्णन आले आहे.

" परसदारीच्या नारळीच्या झावळ्यांतून आकाशात अनेक नक्षत्र चमकत होती, वारा-याची झुळूकही नव्हती, सारं कसं निःस्तब्ध, शांत होतं.... "[२४]

त्याच प्रमाणे लोणावळ्यातील निसर्गाचेही तुटक तुटक वर्णन आले आहे. उदा. " इथ खोल द-या नाहीत, कडे नाहीत, इथं प्रसन्न हिरव्यागार खुरट्या गवतानं सजलेल्या टेकड्या दिसतात, "[२५]

अशा तुटक निसर्ग वर्णनातून कादंबरीत निसर्गाची रूपे आली आहेत. व्यक्तीच्या भावभावना निसर्गाच्या प्रतिमेतून व वर्णनातून लेखकांनी फारशा साकार केलेल्या दिसत नाहीत. कदाचित मुळ पटकथा लेखनात निसर्गाच्या दृश्याचे चित्रिकरण होत असल्यामुळे मुळात ती वर्णने घेतली नसावीत. पटकथेचे कादंबरी रूप होताना या निसर्ग वर्णनाला अपेक्षित इतके स्थान लेखकानी दिले नाही.

काही प्रसंगी रणजित देसाईंची भाषा ही व्यक्तींची भावभावना प्रकट करताना आणि संगीताच्या रागदारीचे वर्णन करताना काव्यमय रूपही धारण करते. लोणावळ्याला रूग्णालयात महेश संगीताची माहिती सांगताना केशरला म्हणतो.

" अंधारी रात्र असते, अजून पहाट व्हायची असते क्षितिजावर पिठोरी रेषाही उमटलेली नसते. अशा वेळी भैरव गातात. पहाट कधी होईल ? प्रियकराची वाट पाहून थकलेल्या प्रेयसीचं विव्हळ मन त्यात गुंतलेलं असतं, सगळीकडे नि:स्तब्ध, शांत, नीरव असतं, आणि मग नकळत पूर्व दिशा पांढरते. धरती जागी होऊ लागते. कुळाच्या आवरणाखाली तापलेला जलाशय श्वास सोडू लागतो.

रात्रीच्या काळोखाला भ्यालेले पक्षी सुटकेचा आनंद व्यक्त करू लागतात. अशा वेळी भटियार येतो. जणू प्रियकराच्या आगमनाचा खलिता प्रेयसीच्या हातीआलेला असतो. उजाडू लागतं, सारी धरित्री दिनकराच्या आगमनाच्या वार्तेनं चैतन्यमय बनते. तेव्हा भूप येतो. मीलनाचा क्षण नजीक आलेला असतो." [२६]

या प्रसंगातून काव्यात्मकताही जाणवते. संपूर्ण कादंबरी मध्ये संगीत आणि गायनाचा चपलक पणे वापर करून घेतला आहे. या संगीताच्या आविष्कारातूनही काव्यात्मकता जाणवते. यांचा उल्लेख मागे आलेला आहे.

वर उल्लेखल्या प्रमाणे छोटया छोटया प्रसंगातून कादंबरी साकार होते. पण रणजित देसाई काही प्रसंग जीवंतपणे आपल्यासमोर भाषेच्या माध्यमातून उभे करतात. एक अपघातातील सोळा वर्षां वयाच्या मुलावर कैलास उपचार करून त्याचा जीव वाचवितो पण त्याची स्मरणशक्ती जाते तो प्रसंग : " एकदा या डॉक्टरांच्या नशिबात यश आणि अपयश काय असतं ते उघड्या डोळ्यांनी बघ काही बोलू नको".

केशर शेजारच्या कोचावर बसली. ती कैलासकडे पाहत होती. कैलास एका पाठोपाठ एक सिगारेट ओढत होता. अर्धवट जळलेली सिगारेट रक्षापात्रात चुरगाळून पुन्हा दुसरी सिगारेट तो पेटवत होता. केशरला कैलासचे ते रुप पाहून काही बोलायचं धाडस होत नव्हतं, काही वेळ गेला आणि एक नर्स धावत तिथं आली ती म्हणाली

" डॉक्टर, पेशंट शुध्दीवर येत आहे, "

कैलासने नर्सकडे पाहिलं,

"त्याच्या जवळ कोण आहे,"

" त्यांचे आई वडील आहेत."

" ठीक आहे, तो शुध्दीवर आला, की मला सांगा."

नर्स निघून गेली, केशर म्हणाली,

" डॉक्टर, मी जाते."

"थांब, माझं कौतुक करायला आलीस का ? मग थोड थांब."

कैलासचं ते रूप बघून केशरला काही बोलणं सुचत नव्हतं.

समोरच्या टेबलावरची आरोग्यविषयक मासिक चाळत ती तशीच बसून होती. प्रत्येक क्षण तिला तासासारखा वाटत होता. काही वेळाने नर्स परत आली. ती म्हणाली,

" पेशंट शुध्दीवर आला आहे !"

" काय झालं " ?

" डॉक्टर, " नर्स उद्‌गारली, " तो आईबापांना ओळखत नाही."

कैलास आपल्या खुर्चीवरून सावकाश उठला. आपल्या हातातली सिगारेट त्यानं रक्षापात्रात चुरगळली, नर्सकडे न बघता तो म्हणाला,

" सिस्टर तुम्ही चला, मी स्वतःयात येतो."

नर्स जाताच कैलास केशरकडे वळून म्हणाला,

" पाहिलंस केशर ? काय झालं ते ? हा सोळा वर्षाचा मुलगा, अपघात झाला, इथं त्याला आणीपर्यंत काही क्षण तो निर्जीव बनला, होता. शेवटच्या प्रयत्न म्हणून मी त्याला भराभर इंजेक्शन दिलो. जेवढे प्रयत्न शक्य होते, तेवढे केले. तो परत श्वासोच्छ्वास करू लागला, पण काही क्षणामध्ये त्यांच्या मेंदूतील ज्या नसा निकामी झाल्या त्या बाबतीत मी काहीच करू शकलो नाही. केशर, मी त्याला जीवंत केल नाही, तर एक शाप देऊन मोकळा झालो आहे. त्या दोन तीन क्षणामध्ये त्याच्या मेंदूतील ज्या नसा निकामी झाल्या, त्यामुळे तो आपल्या आईबापांना ओळखत नाही, केशर, माहित आहे तुला ? तो सोळा वर्षाचा मुलगा आज जन्मला आहे. त्याला जपणार कोण ? या सोळा वर्षातलं त्याला काही आठवणार नाही. आजपासून त्याला सारं नवीन शिकायचं आहे. त्याला सारं शिकवायला हवं. ती ताकद कुणाची ? कोण वाढवणार त्याला ? त्यापेक्षा तो पोर गेला असता

तर फार बरं झालं असतं. एक शारोकांतिका टळली असती." [२७] किंवा महेशासाठी केशर कैलास बरोबर मुंबईला जाऊन बांगड्या विकते व कपडे खरेदी करते तेव्हाचा प्रसंग. यासारख्या प्रसंगातून ही कादंबरी साकार होते. या लहानसहान प्रसंग चित्रणामुळे तिची रंजकता, वाचनियता वाढली आहे.

रणजित देसाई क्वचित प्रसंगी कादंबरीत सहजतेने कोट्यांचाही वापर करतात, महेशाला कैलासचा संशय आल्यावर,

" मग कैलासला सोडून वारूळाला मिठी कशाला घातलीस?" [२८]
असे महेश म्हणतो यात त्यांनी कैलास या शब्दावर कोटी केली आहे, क्वचित प्रसंगी लक्षार्थाने येणारी सूचकताही आढळते.

" तसं पाहिलं तर या काठीची गरज नव्हती, ही आहे ना काठी समोर उभी !" [२९]

अशाप्रकारे रणजित देसाई यांची सहजरम्य दृश्यात्मक उत्कृष्ट संवादातून प्रसंगनिर्मिती करणारी भाषा ओघवती व रंजक ठरली आहे. कदाचित त्या मुळेच ती वाचकांना आवडते.

" अभोगी कादंबरीचे वैशिष्टये :
--------------------------

अभोगी या रणजित देसाई यांच्या कादंबरीमध्ये रंजनवादी कादंबरीची पुढील वैशिष्टे आढळतात. रंजनवादी कादंबरीचा मूळ उद्देश रसिकाच्या घटकाभर मनोरंजन करणे, व वास्तवजीवनापासून कल्पनेच्या जगात नेऊन इच्छापूर्ती करणे हा असतो. या दृष्टीनेच कादंबरीची प्रकृती आणि घाट तयार होतो. रंजनवादी कादंबरीत सामाजिक प्रश्न आधारासाठी घेतलेला असतो. पण या प्रश्नांच्या गुंतागुतीचे स्वरूप समग्रतेने उलगडून दाखविलेले असत नाही. रणजित देसाई यांनी अभोगी या कादंबरीत भाविणीचा प्रश्न केवळ आधारासाठी घेतला आहे. या कादंबरीची नायिका केशर ही भाविणीची मुलगी आहे. तिच्या

आई चंपा ही भावीण आहे. पण चंपा भाविणीचे जीवन काय असते ते आपल्या मुलीला सांगते, " पालखी पुढे नाचायचे, आरतीच्या वेळी भिंतीला पाठ टेकून उभे राहायचे, पूजाऱ्याने दिलेला विडा घ्यायचा कुणी हौशी धनी मिळाला तर घरी घेऊन जायचे, त्याची संगत करायची आयुष्यभर हेच करीत रहायचे." [30] " वृद्धापकाळात अनेक रोगानी पछाडलेल शरीर घेऊन कुढत कुढत रहायचं " [31] या वाक्यावरुन चंपाने भाविणीचे जीवन स्वीकारले आहे. प्रत्यक्ष तिचा तो अनुभव आहे असे केवळ वर्णन येते. पण लेखकाचे चंपाचे हे दाहक जीवन विस्ताराने चित्रित करीत नाही. किंवा मंगेशीच्या इतर भाविणीचे जीवनही त्यात येत नाही. ही प्रथा वाईट आहे. परंपरागत चालत आलेले आहे. असे वरवरचे निरूपण, माहितीच्याअंगाने या कादंबरीत येते. कादंबरीचा मुख्य भर भाविणीची मुलगी केशर, तिचे प्रेम, त्यातील संकटे आणि प्रेमभंग विस्ताराने चित्रित करण्यावरच आहे. केवळ भाविणीची मुलगी म्हणून तिचे दु:ख निर्माण झालेले नसून ते प्रेमभंगातून निर्माण झालेले आहे. केशरचे दु:ख ती भाविणीची मुलगी नसताना ही एक प्रेयसी म्हणून तिच्या वाटयाला आले असते. यावरुन रणजित देसाई यांना भाविणीचे वास्तव जीवन, तिचे दु:ख यातना, चित्रित करावयाचे आहे असे दिसत नाही तर केवळ भाविणीचा प्रश्न आधाराला घेऊन त्या अनुषंगाने प्रेमजीवनावर कादंबरी लेखन करावयाचे आहे. अभोगी या कादंबरीत तीच गोष्ट घडलेली दिसते.

रंजनवादी कादंबरीत सामाजिक वास्तवाला साकार करण्यापेक्षा केवळ त्यांची पार्श्वभूमी घेऊन साकार झालेले असते. व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न कलात्मकतेने उभा करण्यापेक्षा केवळसामाजिकतेचा आभास निर्माण करुन त्याप्रश्नाची मांडणी मनोरंजनाच्या पातळीवरच केलेली असते. त्यामुळे अशा कादंबरीत स्त्री जीवनाचे वरवरचे, अवास्तव व काल्पनिक चित्रण आढळते. अभोगी या कादंबरीची गोष्टयातील

मंगेशीच्या भाविणीच्या सामाजिक वास्तवाचा केवळ आधार घेऊन भाविणीच्या जीवनावर कादंबरी लिहिली आहे. असा आभास घडविला आहे. खरे तर भाविणीचा प्रश्न या कादंबरीत गांभीर्याने वास्तववादी पध्दतीने व सखोलपणे चित्रितच केलेला नाही. या प्रश्नाचे दाहक दर्शनही या कादंबरीत घडत नाही. केवळ भाविणीच्या जीवनाचा अनुरोधाने ती लिहिली असल्याने भाविणीचे दु:ख यातनामय जीवन या कादंबरीमध्ये समर्थपणे चित्रित करण्यात आलेले नाही. या कादंबरीतील चंपा, केशर, यांच्या स्त्रीजीवनाचे चित्रणही सामाजिक आणि धार्मिक भाविणीच्या अनुरोधाने उभे करण्याऐवजी ते प्रेमजीवनाच्या अनुरोधाने चित्रित केले आहे. त्यामुळे तिचे स्वरूप सामाजिक दृष्टया अवास्तव व काल्पनिक बनले आहे.

रंजनवादी कादंबरी ही एखादया सामाजिक प्रश्नाचे धार्मिक सामाजिक, आणि कौटुंबिक पदर उलगडून दाखवित नाही. अभोगी या कादंबरीतही भाविणीच्या परंपरेची धार्मिक आणि सामाजिक बाजू केवळ विस्ताराने चित्रित करीत नाहीत. कौटुंबिक दृष्टया तर ती प्रेम कहाणी आहे.

रंजनवादी कादंबरी प्रसंगाच्या कार्यकारणमीमांसेवर भर देण्या ऐवजी कादंबरीतील घटना केवळ योगायोगावर घडतात, असे दाखविलेले असते. अभोगी या कादंबरीतील काही प्रमुख घटना योगायोगानेच घडलेल्या आहेत. मंगेशीच्या मंदिरात झालेला महेशच्या गायनाचा कार्यक्रम या कार्यक्रमाला संगीताचा आवड असलेला कैलास हजर असणे गायन करताना दमछाक झाल्यावर तपासून महेशला क्षय असल्याचे निदान करणे, लोणावळयात पावसाने ताप आल्यावर महेशचा आवाज दोन वर्षांनंतर एका मंदिरातील साधूच्या गायन प्रसंगी परत येतो. या गोष्टी केवळ, योगायोगामुळे घडलेल्या आहेत. योगायोगामुळे घडलेल्या या घटनेला कादंबरीत अत्यंत महत्वाचे स्थान आहे किंबहुना त्यामुळेच कादंबरीचे कथानक गतिमान होते.

रंजनवादी कादंबरी ही वर्तमान जीवनापेक्षा भूतकालीन जीवनातच जास्त रमते. सौंदर्यवादी लेखकाला इतिहास पुराणाचे आकर्षण असते. पात्राची मनोवृत्तीही पूर्वकालीन जीवनात रमणारी असते. अभोगी या कादंबरीतील पूर्वार्ध : कैलासच्या गतकालीन जीवनाच्या अनुभवातून चित्रित होतो. त्याचे बालपण, कुटुंब, शिक्षण, विवाह प्रेम, आठ या गोष्टी आठवणीतून उलगडत जातात. केशरच्या आठवणीतून महेश व केशरचे बालपण त्यांचे सहजपण ओळख व प्रेम चित्रित केले आहे. अभोगी या कादंबरीतील अशया ब-याचशा घटना आठवणीत येतात. गतकालीन जिवनाचे आकर्षण हे रंजनवादी कादंब-याचे वैशिष्टय आढळते.

रंजनवादी कादंबरीचा मुख्य भर हा मनोरंजन करण्यावर असल्यामुळे ती रसिकाला वास्तवजीवनापासून दूर घेऊन जाते. व स्वप्नमय जगाचे दर्शन घडविते. हा एक प्रकारे पलायनवादच असतो. अभोगी कादंबरीत वास्तव जीवन चित्रित करण्याऐवजी लेखक केशरच्या जीवनातील स्वप्नमय वाटावे अशया प्रेम कहाणीचे दर्शन घडवून मनोरंजन करतो.

रंजनवादी कादंबरीतील पात्र चित्रणे ही श्रीमंत तरूण, ध्येयवादी, त्याग करणारी उदात्त अशीच चित्रित करणारी असतात. अभोगी या कादंबरीतील केशर, महेश, आणि कैलास यांची व्यक्तिचित्रणे अशाच स्वरूपाची आहेत. केशर ही भाविणीची तरूण कलागुण संपन्न सहनशील सेवाभावी प्रेम करणारी नायिका आहे. तर महेश हा अलौकिक गायक कैलास हा उमदा, श्रीमंत, देखणा, सेवाभावी ध्येयवादी, असा डॉक्टर आहे. अशी पात्रे समाजात अपवादात्मक पध्दतीने आढळतात.

रंजनवादी कादंबरी ही प्रेमाचे, शृंगाराचे चित्रण करते. अभोगी या कादंबरीतही केशर आणि महेश, कैलास आणि उल्का, कैलास आणि केशर यांचे उदात्त प्रेम यांचेच प्रामुख्याने चित्रण केले आहे. त्यामुळे या कादंबरीचे स्वरूप प्रेमकहाणीचे ठरले आहे. अशी प्रेमकहाणी कोणत्याही वाचकाला सहजपणे आवडेल अशी उतरली आहे. रंजनवादी

कादंबरीतील ध्येयवाद, सामाजिक सुधारणेचा आग्रह, तुजबी, बेगडी व वरवरचा असतो. भयाण सामाजिक वास्तवाला रंजनवादी कादंबरीने दिलेले हे मनोरंजक उत्तर असते. भाविणीच्या दाहक जीवन कहाणीला कैलासचा ध्येयवाद, त्यांची सेवाभावी वृत्ती, मानवतेच्या पातळीवर केलेली रुग्णसेवा मागणी घालून ही दोन वर्षे बहीण म्हणून सांभाळणे, ही भाविणींच्या प्रश्नाची लेखकाने सोडवलेली सोडवणूक तितकीच काल्पनिक आणि अवास्तव आहे.

रंजनवादी कादंबरीत उत्कंठा वर्धक, गतिमान घटना प्रसंग असतात त्यामुळे ते रसिकाला खिळवून ठेवते. अभोगी कादंबरीमध्येही अशाच गतिमान, रंजक घटनाप्रसंगाची मालिका दिसते.

रंजनवादी कादंबरीमध्ये नायकाच्या एका अलौकिक गुणावर नायिका भाळते व त्यातून प्रेमकहाणी निर्माण होते. अभोगी या कादंबरीतील महेश हा असामान्य गायक आहे. त्यामुळे केशर त्याच्यावर प्रेम करते. डॉ. कैलास संगीताचा रसिक आहे. व तो महेशाच्या गायनाचा चाहता आहे. या कादंबरीत कथानकासाठी लेखकाने संगीताचा वापर करून घेतला आहे. शेवटी महेश अभोगी राग गातो. तशी या कादंबरीतील सर्व पात्रे अभोगी राहतात असे दाखविले आहे.

रंजनवादी कादंबरी निसर्गाची चित्रण केलेले असते. अभोगी ही कादंबरी गोवा आणि लोणावळयाच्या निसर्गरम्य परिसरात घडते त्याची वर्णने या कादंबरीत आलेली आहेत. रंजनवादी कादंबऱ्याची भर आशयापेक्षा अभिव्यक्तीवर असतो. भव्य दिव्य घटना प्रसंग गतिमान कथानक, अलंकारिक व काव्यमय भाषा, ही रंजनवादी कादंबरी अंगाने येणारी वैशिष्टये असतात. अभोगी या कादंबरीतही या गोष्टी आढळतात.

सारांश :

रंजनवादी कादंबरी ही सामाजिक प्रश्नाचे गांभीर्याने चित्रण

करण्याऐवजी मनोरंजनाच्या पातळीवरच मान्य करते. अभोगी या कादंबरीत चित्रित होणारे भाविणीचे जीवन सुध्दा रणजित देसाई यांनी गांभीर्याने, वास्तववादी पध्दतीने, आणि दाहकतेने चित्रित केलेले नसून, या कादंबरीला केवळ भाविणीच्या मुलीची असफल प्रेम कहाणी असे स्वरूप दिले आहे.

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. | देसाई, रणजित | " अभोगी " मेहता प्रकाशन<br>द्वितीय प्रकाशन, १९८७, पृ. क्र. ७९ |
| २. | तत्रैव | पृ. क्र. १७५ |
| ३. | तत्रैव | पृ. क्र. २०९ |
| ४. | तत्रैव | पृ. क्र. १७६ |
| ५. | तत्रैव | पृ. क्र. ९० |
| ६. | तत्रैव | पृ. क्र. १४७ |
| ७. | तत्रैव | पृ. क्र. १५० |
| ८. | तत्रैव | पृ. क्र. ७८ |
| ९. | तत्रैव | पृ. क्र. ११२ |
| १०. | तत्रैव | पृ. क्र. १५१ |
| ११. | तत्रैव | पृ. क्र. १५५ |
| १२. | तत्रैव | पृ. क्र. ११९ |
| १३. | तत्रैव | पृ. क्र. १६२ |
| १४. | तत्रैव | पृ. क्र. १९६ |
| १५. | तत्रैव | पृ. क्र. ८७ |
| १६. | तत्रैव | पृ. क्र. १०९ |
| १७. | तत्रैव | पृ. क्र. १९७ |
| १८. | बापट, प्र. वा.<br>गोडबोले ना. वा. | मराठी कादंबरी ( तंत्र आणि विकास )<br>स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या<br>३८१, क, शनिवार पेठ, पुणे. आ. ३<br>पृ. १२९. |
| १९. | देसाई, रणजित | "अभोगी " उनि. पृ. क्र. १०९ |
| २०. | तत्रैव | पृ. क्र. ८७ |

२१. तत्रैव पृ. क्र. १६६

२२. तत्रैव पृ. क्र. १५९

२३. तत्रैव पृ. क्र. १४०

२४. तत्रैव पृ. क्र. १८८

२५. तत्रैव प्र. क्र. १६६

२६. तत्रैव प्र. क्र. १३८

२७. तत्रैव प्र. क्र. १५८

२८. तत्रैव पृ. क्र. १५०

२९. तत्रैव पृ. क्र. १५४

३०. तत्रैव पृ. क्र. १९६

३१. तत्रैव पृ. क्र. १९६